**सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.६२ अन्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (सा.शै.मा.प्र.) (SEBC) प्रवर्गाकरिता जात प्रमाणपत्र व जात प्रमाणपत्र पडताळणीची कार्यपध्दती तसेच जात प्रमाणपत्र व जात प्रमाणपत्र पडताळणीचे नमुने निर्गमित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : सीबीसी -१०/२०१८/प्र.क्र. १३०/मावक**
मंत्रालय (विस्तार), मुंबई-३२.
दिनांक: ०७ डिसेंबर, २०१८

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक : सीबीसी -१०/२०१३ / प्र.क्र.३५ / मावक, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२. दिनांक १५ जुलै, २०१४.
२. सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२. महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) नागरिकांच्या वर्गांच्या प्रगतीसाठी राज्यातील शैक्षणिक संस्थामंधील प्रवेशाकरिता जागांच्या आरक्षणासाठी आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांच्या आणि पदांच्या आरक्षणासाठी आणि तत्संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींची तरतूद करण्यासाठी अधिनियम.

**प्रस्तावना :-**

राज्य मागासवर्ग आयोगाकडून मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थिती तसेच संलग्न बाबींबाबत दि. १५ नोव्हेंबर, २०१८ रोजी शासनास अहवाल सादर करण्यात आला. सदर अहवालातील शिफारशी मा. राज्य मंत्रिमंडळाच्या दि. १८ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या बैठकीत स्वीकारण्यात आल्या. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत देण्यात आलेल्या निर्देशानुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे शासन निर्णय दि.२२ नोव्हेंबर, २०१८ अन्वये, पुढील वैधानिक कार्यवाही करण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती नेमली. सदर उपसमितीने राज्य विधानमंडळात घेतलेल्या निर्णयानुसार, सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाकरिता आरक्षणासाठी विधेयक मांडण्यात आला. राज्य विधानमंडळाचे हिवाळी अधिवेशन सन २०१८ मध्ये सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२ पारित करण्यात आला.

संदर्भाधीन क्रमांक १ शासन निर्णय दि. १५ जुलै, २०१४ अन्वये, शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग(इएसबीसी) असा नवीन प्रवर्ग घोषित करण्यात आला असून या प्रवर्गातील व्यक्तींना निर्गमित करावयाच्या जात प्रमाणपत्राचा नमुना विहित करण्यात आला आहे. सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२ मधील कलम १८(२)(पाच) मधील तरतुदीनुसार उक्त उद् घोषणा अबाधित ठेवून सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाकरिता तरतुदी करण्यात आल्या आहेत. सदर सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाकरिता (एसईबीसी)(Socially and Educationally Backward Category) जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरिता कार्यपध्दती तसेच जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र यांचे नमुने निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

More Download and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग ( जातींचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन ) अधिनियम, २०००, त्या अंतर्गत महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग ( जातींचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन ) नियम, २०१२, मधील तरतूदींनुसार राज्यात जात प्रमाणपत्र व त्याच्या पडताळणीचे नियमन केले जाते. सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गासाठी जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरिता उपरोक्त अधिनियम,२००० व नियम,२०१२ मधील तरतूदी लागू राहतील. तसेच संदर्भाधीन क्रमांक १, शासन निर्णय दि. १५ जुलै, २०१४ अन्वये, शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागासप्रवर्गांकरिता(ईएसबीसी) देण्यात आलेली जात प्रमाणपत्रे ही संदर्भाधीन क्रमांक २ अधिनियमान्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) प्रवर्गाकरिता ग्राहय धरली जातील.

**अ) जात प्रमाणपत्राचा नमुना-**

**<u>मराठी नमुना</u>**

महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असलेल्या सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गातील जात प्रमाणपत्राचा नमुना.

पडताळणी केलेले दस्तऐवज :-

(१)

(२)

(३)

(४)

**जात प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती/कुमारी* ........................................................ श्री./श्रीमती*........................................................यांचा/यांची मुलगा/मुलगी गाव /शहर*.................. जिल्हा/विभाग*...........................................राज्य महाराष्ट्र, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा शासन निर्णय क्र.सीबीसी-१०/२०१३/ प्र.क्र.३५/मावक दि. १५ जुलै, २०१४ अंतर्गत ..................जातीची असून वेळोवेळी सुधारणा केल्याप्रमाणे सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाची आहे.

२. श्री./श्रीमती/कुमारी* ..................................................................आणि किंवा त्यांचे /तिचे कुटुंब.................गाव/शहर* ..................जिल्हा/विभाग, महाराष्ट्र राज्य येथील सर्वसाधारण रहिवासी आहेत.

नाव व सही
पदनाम
(कार्यालयाच्या शिक्क्यासहीत)

ठिकाण :
दिनांक :

*कृपया लागू नसलेला मजकुर खोडावा.



More Download and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

## इंग्रजी नमुना

Form of Caste Certificate to be issued to Socially and Educationally Backward Category persons belonging to the State of Maharashtra.

Documents verified :- (1)

(2)

(3)

(4)

## CASTE CERTIFICATE

This is to certify/that Shri/Shrimati/Kumari*________________________________

Son/Daughter* of ______________________ of Village/Town*_________________ in District/Division*_______________________________________________ of the State of Maharashtra belongs to the ____________________ Caste under the Government Resolution Social Justice & Special Assistance Department No.CBC-10/2013/C.R.35/Mavak, dated 15th July, 2014 as amended from time to time as a Socially and Educationally Backward Class.

2. Shri/Shrimati/Kumari*__________________________________________ and/or his/her* family ordinarily reside (s) in village/Town ___________________ of ____________________ district/division of the State of Maharashtra.

Signature _______________

Designation_______________

With Seal of Office.

Place __________

Date __________

*Please delete the words which are not applicable.



More Download and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

**ब ) जात पडताळणी प्रमाणपत्राचा नमुना**

**मराठी नमुना**

**वैधता प्रमाणपत्र**

**जात प्रमाणपत्र पडताळणी समिती............................................क्र.................................................**

समिती निर्णय क्रमांक .........................दिनांक ............................प्रमाणपत्र क्र................. ज्याअर्थी, श्री./श्रीमती/कुमारी........................................यांचा दिनांक ............................................... रोजीचा अर्ज सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्ग यांच्या जाती प्रमाणपत्राची पडताळणी करण्याकरिता पडताळणी समितीला कागदपत्रांसह प्राप्त झाला होता आणि तो अर्ज दिनांक ........................ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीमध्ये उक्त समितीसमोर ठेवण्यात आला होता.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३) व महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम २०१२, अन्वये समितीला प्रदान केलेल्या अधिकारानुसार समितीसमोर सादर केलेल्या कागदपत्रांच्या तथा पुराव्यांच्या आधारे जात प्रमाणपत्राची /दावा केलेल्या जातीची तपासणी व पडताळणी केली.

त्याअर्थी, आता, समिती याद्वारे प्रमाणित करीत आहे की, दावा केलेली जात आणि तहसीलदार व कार्यकारी दंडाधिकारी/उपविभागीय अधिकारी/उप जिल्हाधिकारी................. जिल्हा.................. यांनी दिनांक .............. रोजी दिलेले क्रमांक ................ चे जाती प्रमाणपत्र बरोबर असल्याचे आढळून आले आहे.

प्रमाणित करण्यत येत आहे की, श्री./श्रीमती/कुमारी........................................... यांचे ............. जातीचे प्रमाणपत्र वैध असल्याचे आढळून येत आहे.

स्वाक्षरी

सदस्य -सचिव तथा संशोधन अधिकारी

जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती..............क्र..................

शिक्का



More Download and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

<u>इंग्रजी नमुना</u>

# CERTIFICATE OF VALIDITY

CASTE CERTIFICATE SCRUTINY COMMITTEE-----------------NO------

Committee decision No. ------------------------------- dated----------

WHEREAS, an application of Shri/Smt./Kumari ...........................................................dated..........................alongwith the documents was received by the Scrutiny Committee for verification of Caste Certificate of Socially and Educationally Backward Category and the same was placed before the said Committee in the meeting held on --------------------------

**AND WHEREAS** in accordance with the powers conferred on it under Maharashtra Scheduled Caste, Scheduled Tribes, De-Notified Tribes (Vimukta Jatis)/Nomadic Tribes, Other Backward Class and Special Backward Category (Regulation of Issuance and Verification of) Castes Certificate Act, 2000 (**Mah.XXIII** of 2001); Maharashtra Scheduled Caste, De-Notified Tribes (Vimukta Jatis), Nomadic Tribes, Other Backward Class and Special Backward Category (Regulation of Issuance and Verification of) Caste Certificate Rules, 2012, the Committee on the basis of the documents and evidence produced before it verified and scrutinized the said Caste Certificate/Claim.

**NOW, THEREFORE,** the Committee hereby certifies that caste claim is found to be correct and the caste certificate bearing No...................... dated................... issued by the Tahsildar and Executive Magistrate/Sub-Divisional Officer/Deputy Collector---------------------------------------------District---------------------------certifying that Shri/Smt/Kumari---- ------------------------------ belongs to-------------------------Caste/Tribe is found To be VALID.

Signature

Member Secretary and Research Officer

Seal

Caste Certificate Scrutiny

Committee..................... No....................



More Download and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८१२०७१७३३११४८२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( दिनेश वाघमारे )**
सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) खाजगी सचिव, मा.मुख्यमंत्री, मंत्रालय, मुंबई.
२) खाजगी सचिव, मा.मंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य), मंत्रालय, मुंबई.
३) खाजगी सचिव, मा.मंत्री (महसूल), मंत्रालय, मुंबई.
४) खाजगी सचिव, मा.मंत्री (उद्योग), मंत्रालय, मुंबई.
५) खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री (सामान्य प्रशासन विभाग), मंत्रालय, मुंबई.
६) खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य), मंत्रालय, मुंबई.
७) विरोधी पक्ष नेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
८) विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
९) अप्पर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) अप्पर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) अप्पर मुख्य सचिव, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) सचिव, वैद्यकीय शिक्षण वऔषधी द्रव्ये विभाग, जी.टी. हॉस्पिटल, मुंबई.
१७) सचिव (सा.वि.स.), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१९) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई.
२०) महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर.
२१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२२) मुख्य महानगर दंडाधिकारी,
२३) सर्व विभागीय आयुक्त,
२४) सर्व जिल्हाधिकारी,
२५) सर्व उप विभागीय दंडाधिकारी (महसूल) तथा उप विभागीय अधिकारी,
२६) सर्व तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार,
२७) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई.
२८) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय अपील शाखा, मुंबई.



More Download and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

२९) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, खंडपीठ नागपूर.
३०) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय अपील शाखा, नागपूर.
३१) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, खंडपीठ औरंगाबाद.
३२) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय अपील शाखा, खंडपीठ औरंगाबाद.
३३) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३४) महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
३५) संचालक, विजाभज संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३६) संचालक, उच्च तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३७) संचालक, माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३८) संचालक, प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३९) सदस्य सचिव, राज्य मागासवर्ग आयोग, पुणे.
४०) सर्व मंत्रालयीन विभाग/सर्व विधानसभा /विधानपरिषद सदस्य
४१) त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना याबाबतच्या सूचना द्याव्यात.
४२) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग/सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण
४३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
४४) सर्व जिल्हा परिषदांचे समाजकल्याण अधिकारी
४५) सर्व अध्यक्ष/सदस्य सचिव, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती
४६) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
४७) निवड नस्ती, का-मावक.



More Download and guidance @ www.omkarshendure.com (AEE)